दैनिक

शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६

# दिव्य मातृछाया

बुलडाणा

महाराष्ट्राचे एकमेव स्वतंत्र वृत्तपत्र

● वर्ष : पाचवे ● अंक : २९७ ● पाने : ४ ● RNI.NO. MAHMAR/2022/87711 | www.matruchhaya.in | ● मुख्य संपादक : सादिक कुरेशी 9420647272 ● कार्यकारी संपादक : आसिफ गवळी 9767681555

# विरोधकांच्या एकीने सरकारवर नामुष्की

## घटनादुरुस्ती विधेयक दोन तृतीयांश बहुमतापासून दूर



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**नवी दिल्ली :** विधानसभा, लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याबरोबरच लोकसभा मतदारसंघांची वाढ करण्यासाठीचे घटनादुरुस्ती विधेयक शुक्रवारी लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताअभावी फेटाळले गेले. मतदारसंघ फेररचनेच्या विरोधात ठाम भूमिका घेणाऱ्या 'इंडिया' आघाडीने शेवटपर्यंत एकजूट राखल्याने ही घटनादुरुस्ती प्रतिष्ठेची करणाऱ्या एनडीए सरकारवर पराभवाची नामुष्की ओढवली.

मोदी सरकारच्या आजवरच्या कार्यकाळात विरोधामुळे नामंजूर झालेले हे पहिले विधेयक ठरले. त्याबरोबरच महिला आरक्षणाद्वारे पाच राज्यांच्या ऐन निवडणुकीदरम्यान राजकीय फायदा मिळवण्याच्या भाजपच्या प्रयत्नांवरही पाणी पडले.

लोकसभेच्या विशेष अधिवेशनात गुरुवारी आणि शुक्रवारी झालेल्या १८ ते २० तासांच्या चर्चेनंतर शुक्रवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी घटनादुरुस्ती विधेयक मतदानाला टाकले. मात्र, विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीने सुरुवातीपासून घेतलेली विरोधाची भूमिका कायम ठेवल्याने विधेयक सभागृहाच्या पटलावर नामंजूर होण्याची औपचारिकता उरली होती. सभागृहात एनडीएचे एकूण संख्याबळ २९८ इतके होते. बहुमतासाठी त्यांना ३५२ मतांची गरज होती. मात्र, तेवढी मिळू न शकल्याने विधेयक फेटाळले गेले.

हे विधेयक संमत झाले असते तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले असते मात्र, विरोधकांच्या अडेलतट्टूपणामुळे महिला तिसऱ्यांदा आरक्षणापासून वंचित राहिल्या, असे खापर केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी इंडिया आघाडीवर फोडले. महिलांच्या सशक्तीकरणासाठी एनडीए सरकार पुन्हा घटनादुरुस्ती विधेयक संसदेत मांडेल, अशी ग्वाहीही रिजिजू यांनी दिली.

विरोधी पक्षांनी सरकारच्या या पराभवाबद्दल आनंद व्यक्त केला. मात्र महिला आरक्षणाला आपला पाठिंबा असल्याचा पुनरूच्चारही केला. ताज्या जनगणनेनुसार लोकसभा मतदारसंघांची फेररचना, दक्षिणेकडील राज्यांच्या जागांमधील संभाव्य घट, जातनिहाय आरक्षणाचा आग्रह या मुद्द्यांवर विरोधकांनी भूमिका कायम ठेवली आहे.

### विरोधी पक्षांचे ऐक्य

- विधेयकावरील मतदानावेळी विरोधकांच्या इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांनी विरोधामध्ये मतदान केले. कोणताही पक्ष गैरहजर राहिला नाही वा मतदानापासून अलिप्त राहिला नाही.

### राज्यसभेत पंतप्रधानांचे आवाहन

- पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्वपक्षीय खासदारांना अंतरात्माचा आवाज ऐकण्याचे आवाहन केले. राज्यसभेमध्ये हरिवंश यांची बिनविरोध उपसभापती निवड करण्यात आली. त्यांचे अभिनंदन करताना शुक्रवारी मोदींनी राज्यसभेत भाषण करताना महिलांना आरक्षण देण्यासाठी खासदारांनी घटनादुरुस्ती विधेयक संमत करण्याची विनंती केली. मोदींच्या राज्यसभेतील सर्वपक्षीय आवाहनानंतर घटनादुरुस्ती व विधेयक फोल ठरण्याचे स्पष्ट झाले. ह्य्गेल्या चार दशकांपासून महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून देशाचे राजकारण केले जात आहे. आता देशाच्या निम्म्या लोकसंख्येला त्यांचे हक्क मिळतील याची खात्री करण्याची वेळ आली आहे. स्वातंत्र्याच्या इतक्या दशकांनंतरही, निर्णय प्रक्रियेत भारतीय महिलांचे प्रतिनिधित्व इतके कमी असणे योग्य नाही. लोकसभेत मतदान होणार आहे. मी सर्व राजकीय पक्षांना विनंती करतो... आवाहन करतो... कृपया काळजीपूर्वक विचार करा आणि अत्यंत संवेदनशीलतेने निर्णय घ्या, आणि महिला आरक्षणाच्या बाजूने मतदान

# ॲड. काझींच्या एमएलसीसाठी राष्ट्रवादीकडे साकडे घालणार

## आ .कायंदेंच्या नेतृत्वात उपमुख्यमंत्र्याच्या भेटीचे नियोजन



● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**देऊळगाव राजा :** राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष ॲड.नाझेर काझी यांची विधान परिषदेवर (एम एल सी) नियुक्ती करा या मागणीसाठी आमदार मनोज कायंदे यांच्या नेतृत्वात जिल्हाभरातील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते एकवटले असून या मागणीसाठी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व पक्षातील वरिष्ठ नेत्यांची भेट घेणार असल्याची माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षाचे ज्येष्ठ नेते संतोष खांडेभराड यांनी दिली आहे.

यावेळी आमदार मनोज कायंदे म्हणाले पक्षाचे ज्येष्ठ नेते व ॲड. नाझेर काझी यांनी जिल्हा सह महाराष्ट्रभरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बळकटीसाठी केलेले प्रामाणिक कार्य, त्यांची पक्षनिष्ठा, कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्याची, कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेण्याची तळमळ बघता त्यांना एमएलसी वर घेणे ही बुलढाणा जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भावना आहे. पक्षाचे नेते अजित पवार हयात असताना आम्ही अनेक वेळा ही मागणी रेटून धरली, व दिल्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची मनोकामना बघता लवकरच राज्याच्या उपमुख्यमंत्री, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्राताई पवार, त्याचे नेते प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांची भेट येणार असल्याचे आमदार मनोज कायंदे यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले.

ॲड.काझी यांची विधान परिषदेवर निवड करा या मागणी संदर्भात आयोजित आढावा बैठकीत नरहरी गवई, नितीन कायंदे,प्रा सुभाष दराडे, श्याम मेहत्रे,गणेश डोईफोडे, प्रदीप वाघ, राजेंद्र खांडेभराड,सुनील शे जु ळ क र , ग जा न न काकड,निलेश ठाकरे,दीपक चेके, शेख नाझीम,न प बांधकाम सभापती विष्णू झोरे,शिक्षण सभापती नमीरा शेख अतिक, सभापती वैशाली विकास कासारे, नगरसेवक म.असेल जनता सेवा,अफरोज बावा, गौरव गीते, ज्ञानेश्वर टेकाळे, निलेश गीते,अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष अजगर शहा, अशपाक टेलर, महंमद रफीक, सतीश झिने, आदींची उपस्थिती होती.

- नुकतेच स्थानिक समर्थ कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात आमदार मनोज कायंदे यांच्या नेतृत्वात जिल्हाभरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाचे नेते तथा जिल्हाध्यक्ष ॲड.नाझेर काझी यांची विधान परिषद सदस्य म्हणून निवड करा अशी एकमुखी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या जिल्हाभरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली.
- याप्रसंगी आमदार मनोज कायंदे, माजी नगराध्यक्ष संतोष खांडेभराड, ज्येष्ठ नेते धनशीराम शिपने, हाजी म. सिद्दीक,प्रा. दिलीप सानप, प्रा.दिलीपकुमार झोटे, नगराध्यक्ष माधुरी शिपने, इरफान अली,ज्येष्ठ नेते भानुदास कोल्हे, देविदास ठाकरे, तालुका अध्यक्ष सदाशिव मुंडे, आदींनी सदर बैठकीत ऍड.नाझेर काझी यांना पक्षाने विधान परिषद एम एस सी वर संधी देण्या विषयी आग्रहाची मागणी करीत कार्यकर्त्यांच्या भावना पक्षश्रेष्ठीने समजून घ्याव्यात अशा भावना व्यक्त केल्या.

# युवासेना उपजिल्हाप्रमुख अतिश तायडे यांची मागणी

## सिंदखेडराजात गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसाय ठप्प



● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** दि.17 एप्रिल रोजी ऐतिहासिक सिंदखेडराजा शहरात गेल्या १५ ते २० दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल व्यवसाय पूर्णपणे ठप्प होण्याच्या मार्गावर आला आहे.

या गंभीर परिस्थितीमुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून अनेकांच्या उपजीविकेवर संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील समस्त हॉटेल व्यावसायिकांनी तहसीलदार अजित दिवटे यांना निवेदन देत गॅस पुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली आहे. मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या टंचाईमुळे अनेक हॉटेल्स बंद पडण्याच्या स्थितीत असून, त्यांच्याकडे काम करणाऱ्या शेकडो कामगारांच्या हाताला काम उरलेले नाही. आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या व्यावसायिकांसमोर आता कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

गेल्या २० दिवसांपासून खंडित झालेला व्यावसायिक गॅस पुरवठा तातडीने पूर्ववत करावा, तुटवड्यामुळे वाढलेल्या काळ्या बाजारावर नियंत्रण मिळवावे तसेच हॉटेल व्यावसायिकांना न्याय देऊन त्यांचे आर्थिक नुकसान टाळावे, अशा मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. या मागणीला युवासेना उपजिल्हाप्रमुख अतिश बाळाजी तायडे यांनीही पाठिंबा देत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका स्पष्ट केली आहे.

# चिखली पोलिसांची मोठी कामगिरी; २.३० लाखांचे १९ मोबाईल हस्तगत

● दिव्य मातृछाया
● वृत्त संकलन

**चिखली :** शहर व परिसरात गेल्या काही काळापासून मोबाईल हरविल्याच्या वाढत्या तक्रारींना गांभीयनि घेत चिखली पोलिसांनी प्रभावी कारवाई करत तब्बल २ लाख ३० हजार रुपये किमतीचे १९ मोबाईल शोधून काढण्यात यश मिळवले आहे. ठाणेदार भूषण गावंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी बजावली. हस्तगत करण्यात आलेले मोबाईल संबंधित मूळ मालकांना परत करण्यात आल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.



हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलमध्ये रिअलमी, ओप्पो रेनो, रेडमी नोट ८, सॅमसंग, रिअलमी नाझों, व्हिवो, वन प्लस, व्हिवो वाय १६ आदी कंपन्यांच्या मोबाईलचा समावेश आहे. या मोबाईलची स्वतंत्र किंमत ५ हजार रुपयांपासून २८ हजार रुपयांपर्यंत असून सर्व मोबाईलची एकूण किंमत २ लाख ३० हजार रुपये इतकी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. हरविलेल्या वस्तूंचा शोध घेऊन त्या मूळ मालकांच्या ताब्यात देणे हे पोलिसांसाठी विश्वासार्हतेचे काम मानले जाते आणि चिखली पोलिसांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्याचे या कारवाईतून दिसून आले. विशेष म्हणजे, या कारवाईमुळे नागरिकांमध्ये पोलिसांविषयीचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. मोबाईल हरवल्यानंतर तो परत मिळण्याची शक्यता कमी असते, अशी सर्वसामान्य धारणा असताना चिखली पोलिसांनी योग्य नियोजन आणि समन्वयाच्या बळावर ती मोडून काढली आहे. त्यामुळे पोलिसांच्या दक्षतेचे आणि कार्यकौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत पोलिस निरीक्षक भूषण गावंडे, पोहेकॉ शरद भागवतकर, पोहेकॉ विजय किटे, पोकॉ सुनील राजपूत, मपोकॉ रुपाली उगले तसेच तांत्रिक विश्लेषण विभाग, बुलढाणा येथील पवन मखमले आणि कैलास ठोंबरे यांनी मोलाचे सहकार्य केले. चिखली पोलिसांची ही कारवाई केवळ गुन्हे उघडकीस आणणारी नाही, तर नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलिस दल किती तत्परतेने काम करत आहे, याचे उत्तम उदाहरण ठरत आहे. रिअलमी, ओप्पो रेनो, रेडमी नोट ८, सॅमसंग, रिअलमी नाझों, व्हिवो, वन प्लस, व्हिवो वाय १६ आदी कंपन्यांचे एकूण १९ मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले.

- चिखली पोलिस स्टेशन हद्दीत मोबाईल गहाळ होण्याच्या घटना वाढत असल्याने पोलिस प्रशासनासमोर हे एक गंभीर आव्हान बनले होते. या पार्श्वभूमीवर ठाणेदार भूषण गावंडे यांनी विशेष पथक स्थापन करून या पथकाला हरविलेले मोबाईल शोधण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. या पथकात पोलिस अंमलदार विजय किटे सुनील राजपूत, निलेश सावळे तसेच महिला पोलिस अंमलदार रुपाली उगले यांचा समावेश होता. पथकाने विविध ठिकाणी मिळालेल्या माहितीसोबतच तांत्रिक विश्लेषणाचा आधार घेत वेगवेगळ्या कंपन्यांचे एकूण १९ मोबाईल हस्तगत केले.

# भाई अमित काकडे यांची सदस्य पदी बिनविरोध निवड..!

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार

**लोणार :** लोणार तालुक्यातील गायखेड ग्रामपंचायत प्रभाग क्रं 2 मधून सदस्य पदा करिता आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते तथा ऑल इंडिया पॅन्थर सेना विदर्भ कार्यध्यक्ष यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून या निवडी मुळे बहुजन समाजात आनंदाचे वातावरण असून प्रभागच्या विकासाठी आपण कटिबद्ध असल्याचा विश्वास देत अमित काकडे यांनी ग्रामस्थानचे आभार म्हणाले त्या या निवडीने ग्रामीण भागात युवकांचा ग्रामपंचायत निवडणुकीत वाढता सहभाग या नंतर बघायला मिळणार असून येणाऱ्या काळात ग्रामपंचायतिचा कारभार युवा नेतृत्वाच्या हातात असेल असेच चित्र आता तालुक्यात बघायला मिळेल एवढे मात्र नक्की.



# संग्रामपूर औषध विक्रेत्यांवर होणारे खोटे आरोप थांबवा

## अन्यथा औषध पेढ्या बंद केमिस्ट असोसिएशनचा इशारा

- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**संग्रामपुर :** तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने तहसीलदार, संग्रामपूर यांना निवेदन देऊन होणाऱ्या आधारहीन व बदनामीकारक आरोपांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे कारवाई व दुसरीकडे बदनामी अशी दुहेरी ससेहोलपट सुरु आहे. वास्तविक पाहता संघटनेचे सर्व सभासद शासनाच्या नियमांनुसार व ड्रग अँड कॉस्मेटिक ॲक्टनुसार व्यवसाय करतात. 24 तास सेवा, बिलासह खरेदी-विक्री व औषधांच्या साठवणुकीचे सर्व नियम पाळले जातात. संग्रामपूर तालुका संघटना महाराष्ट्रात अग्रणी असून औषध विक्रेत्यांनी जनसेवेत व रुग्णसेवेत आदर्श स्थापित केला आहे. त्यामुळे तालुक्याचा राज्य पातळीवर गौरव झाला आहे बिनबुडाचे आरोपः मागील काही काळापासून स्वप्निल देशमुख हे हेतुपुरस्सर व पूर्वग्रहदूषित वृत्तीने 'नशेची औषधे, गुंगी आणणारी औषधे, अवैध औषधे विकली जातात' असे खोटे आरोप लावून सामाजिक प्रतिष्ठेला धक्का लावत आहेत.



**केमिस्ट असोसिएशनचा संघटनेची भूमिका**

♦ "आम्ही सामाजिक आरोग्याची जबाबदारी जपत व्यवसाय करतो. आमच्यावर होणारे खोटे आरोप व बदनामी आम्ही सहन करणार नाही. आम्ही स्वतः चुकीच्या गोष्टींचे समर्थन करत नाही. तसे काही आढळ्यास कारवाईला सहकार्य करू. मात्र केवळ बदनामीच्या हेतूने समाजात विषमता निर्माण करणे थांबवावे," अशी मागणी संघटनेने केली आहे.

**औषध विक्री बंद करण्याचा इशारा**

♦ सामाजिक अवहेलना व बदनामी थांबली नाही, तर आम्ही आमच्या औषध पेढ्या बंद करू. त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीला प्रशासन जबाबदार राहील," असा स्पष्ट इशारा संग्रामपूर तालुका औषध विक्रेते संघटनेने दिला आहे.

प्रशासनाची चौकशी या आरोपांनंतर अन्न व औषध प्रशासनाने संग्रामपूर तालुक्यात दोन वेळा कार्यशाळा घेऊन तपासणी केली. सर्व आरोप खोटे असल्याचे सिद्ध झाले. कोणत्याही गैरप्रकार, अवैध औषध किंवा नशेची औषधे आढळली नाहीत. किरकोळ त्रुटींसाठी काही पेढ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई झाली, ती मात्र ड्रग ॲक्टच्या पूर्ततेसाठी होती.

मार्च महिन्यात संग्रामपूर तालुक्यात तपासण्या सुरू केल्या आहेत. याबाबत स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांना अवगत करण्यात आले आहे. यासंदर्भात आलेल्या बातम्यांच्या अनुषंगाने, बातमीत नमूद केल्याप्रमाणे झोपेच्या गोळ्या, गर्भपाताची औषधे, गुंगी आणणारी औषधे तपासणीमध्ये आढळून आलेली नाहीत. अन्य काही त्रुटी आढळलेल्या पेढ्यांवर औषध सौंदर्यप्रसाधने कायदा 1940 व त्या अंतर्गत नियम 1945 नुसार कारवाई सुद्धा करण्यात आली आहे. असे गजानन गिरके सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी स्पष्ट केले

> "फार्मासिस्ट संघटनेने निवेदन दिले असून त्यांच्यावर आरोप होणे दुर्दैवी आहे. यासंबंधी तपासण्या व कारवाई सुरू आहे. FDA चे अधिकारी गजानन घिरके यांनी याबाबत अवगत केले आहे. तालुक्यात फार्मासिस्ट संघटनेने समाजहिताची भूमिका घेतली आहे. आरोपांच्या कडे दुर्लक्ष करून नियमांच्या अधीन राहून फार्मासिस्ट यांनी आपलं आरोग्य सेवेचे कार्य सुरु ठेवावे.
>
> **- प्रशांत पाटील,** तहसीलदार संग्रामपूर

> संग्रामपूर तालुक्यात जिथे डॉक्टर नाहीत अशा ठिकाणी आरोग्य यंत्रणेला फार्मासिस्ट यांची मोलाची मदत होते. फार्मासिस्ट हा आरोग्य सेवेतील महत्त्वाचा दुवा आहे. त्यांनी आपले आरोग्य सेवेचे काम निरंतर करत रहावे.
>
> **- चंद्रशेखर मारोडे,** तालुका आरोग्य अधिकारी संग्रामपूर

# वसमतच्या तहसीलदार शारदा दळवी यांच्या निलंबनाविरोधात नागरिकांचा संताप



- दिव्य मातृछाया
- शेख अफसर

**वसमत :** वसमत येथील तहसीलदार श्रीमती शारदा दळवी यांच्यावर महसूल विभागाने दि. ९ एप्रिल रोजी केलेल्या निलंबन कारवाईच्या निषेधार्थ तालुक्यातील नागरिकांनी एकत्र येत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित निलंबन तात्काळ मागे घेण्यात यावे, अशी मागणी करत नागरिकांच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांना निवेदन सादर करण्यात आले.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ही कारवाई एकतर्फी असून न्याय्य नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. मागील अडीच ते तीन वर्षांपासून तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती दळवी यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य, गरीब व शेतकरी वर्गासाठी प्रामाणिकपणे काम केले.



**कारवाई मागे घेण्याची मागणी**

शेती रस्ते, पूर परिस्थिती तसेच विविध जमीन विषयक प्रकरणे त्यांनी पारदर्शक पद्धतीने आणि दलालांविना सोडविल्यामुळे त्यांची जनसामान्यात चांगली प्रतिमा निर्माण झाली होती. केवळ त्या कायद्यावर बोट ठेवून सामान्य नागरिकांचे काम करत होत्या त्यामुळे तहसील परिसरात असलेल्या दलालांना त्या भिक घालत नव्हत्या त्यामुळे त्यांच्यावर नेहमी दबाव येत असे.

याशिवाय, रेती माफिया व मुरूम वाहतूक करणाऱ्यांविरोधात त्यांनी कठोर कारवाई केली होती. सध्या तहसील परिसरात अनेक अनाधिकृत वाळू वाहनावर कारवाई केलेली अनेक वाहने त्यांनी जप्त करून त्यांना दंड ठोठावला होता.

त्यामुळेच त्यांच्या विरोधात ही कारवाई करण्यात आली असावी, अशी शंका नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

"अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांवर कारवाई होत असेल,तर भविष्यात अधिकारी वर्ग सामान्यांच्या प्रश्नांवर काम करण्यास टाळाटाळ करेल," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

त्यामुळे श्रीमती शारदा दळवी यांच्यावरील निलंबन तात्काळ रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घ्यावे, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर वसमत तालुक्यातील शेकडो नागरिकांच्या सह्या आहेत.

# मुक्ताईनगरला मिळणार तांत्रिक शिक्षणाची नवी दिशा

## आमदार एकनाथ खडसे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश ; अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

- दिव्य मातृछाया
- अतिक खान

**मुक्ताईनगर :** परिसरातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्यात आलेले शासकीय तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) अखेर पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रत्यक्ष सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार एकनाथ खडसे यांना यश मिळाले असून, स्थानिक पातळीवर समाधान व्यक्त होत आहे.



**उपमुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती; प्रक्रियेला वेग**

♦ राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आमदार खडसे यांना पाठवलेल्या लेखी पत्राद्वारे महत्त्वाची माहिती दिली आहे. संस्थेचे काम अंतिम टप्प्यात असून, पुढील शैक्षणिक सत्रात प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यासाठी आवश्यक सर्व तांत्रिक बाबी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

### बांधकाम अंतिम टप्प्यात; उर्वरित कामांना गती

सध्या तंत्रनिकेतनाच्या मुख्य इमारतीचे सुमारे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे वेगाने सुरू असून, अंतर्गत फर्निचर, वीज आणि पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधांची कामेही वेळेत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून कामावर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

### शेतकऱ्यांच्या सहकार्याने अडथळे दूर

बांधकामादरम्यान रस्त्याच्या अडथळ्यामुळे काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, आमदार खडसे यांच्या पुढाकाराने स्थानिक शेतकऱ्यांनी मोठेपणा दाखवत स्वतःची जमीन बक्षीस पत्राद्वारे हस्तांतरित केली. त्यामुळे सर्व अडथळे दूर झाले असून प्रकल्पाला गती मिळाली आहे.

### विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा

तंत्रनिकेतन सुरू झाल्यानंतर मुक्ताईनगरसह जळगाव जिल्ह्यातील विशेषतः अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याची गरज कमी होणार असून स्थानिक स्तरावरच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार आहे.

एकूणच, आमदार एकनाथ खडसे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मुक्ताईनगरचे तांत्रिक शिक्षणाचे स्वप्न आता प्रत्यक्षात पूर्ण होण्याच्या मार्गावर असून, परिसराच्या शैक्षणिक विकासाला नवी चालना मिळणार आहे.

# मंगरुळपीर तालुक्यातील कवठळ येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

- दिव्य मातृछाया
- फुलचंद भगत

**वाशिम :** मंगरुळपीर तालुक्यातील कवठळ येथील श्री.दामोदर महाराज संस्थानवर दि.१७ एप्रील रोजी महसुल विभागाकडुन आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रम ऊत्साहात संपन्न झाला. यावेळी विविध शासकीय सेवेचे मान्यवर अधिकाऱ्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

या अभियानामुळे येत्या काळात सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात बदल घडविण्यास मदत होणार आहे. आगामी काळातही अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करावे अशी मागणी होत आहे. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता या योजनेच्या माध्यमातून येत्या ५ वर्षांत सर्व शेतरस्ते, पाणंद रस्ते तयार करण्यात येणार आहेत असेही या कार्यक्रमप्रसंगी सांगण्यात आले.या अभियान कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक रवि काळे उपविभगीय अधिकारी मंगरुळपीर,सुधाकर अनासुने तहसिलदार मंगरुळपीर,रवि राठोड प्रमुख अतिथी नायब तहसिलदार मंगरुळपीर,रविंद्र ठाकरे भाजपा तालुका अध्यक्ष,राजुभाऊ जाधव माजी जिल्हा परीषद सदस्य,बेबीताई राठोड उपसरपंचा ग्रा.पं. कवठळ, सतीष क्षीरसागर पोलीस पाटील कवठळ व कोठारी,दिक्षा दुबळगुंडे सरपंचा कोठारी



♦ छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शी प्रशासन होते, या त्रिसूत्रीची प्रेरणा घेऊन अभियानाला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिर असे नाव दिले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, सिमाताई गायकवाड सरपंचा ग्राम पंचायत कवठळ यांची ऊपस्थीती होती.यावेळी कवठळ गावातील अडीअडचणी माजी सरपंच चंद्रशेखर भगत यांनी मांडल्या.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन रवि काळे उपवविभागीय अधिकारी मंगरुळपीर यांच्या हस्ते प्रमाणपत्रे/शासकीय सेवेचा लाभ वितरण करण्यात आले.ऊत्पन्न प्रमाणपत्र,जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार अनुदान व श्रावन बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतनयोजनेचे मंजुरी पत्राचे वाटप, डिजिटल सातबारा, आठ अ, फेरफाराचे वितरण, भारतीय निवडणूक आयोगाचे मतदार ओळखञ, बेबी केअर किट आदींचेही वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन विलास लोंढे ग्राम महसुल अधिकारी चांधई तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजक रवि राठोड नायब तहसिलदार मंगरुळपीर यांनी मानले,कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुंदन पांडे मंडळ अधिकारी कवठळ, अमर शिंदे ग्राम महसुल अधिकारी कवठळ व कवठळ मंडळातील सर्व ग्राम महसुल अधिकारी व महसुल सेवक तहसिल कार्यालय मंगरुळपीर यांनी परिश्रम घेतले.यावेळी मान्यवरांसह गावकऱ्यांची ऊपस्थीती होती.

# हवाई दलाच्या विमानाचा अपघात; पुणे विमानतळावरील वाहतूक ठप्प

**पुणे :** भारतीय हवाई दलाच्या विमानाचा अपघात झाल्यामुळे पुणे विमानतळावरील धावपट्टी शुक्रवारी (१७ एप्रिल) रात्रीच्या सुमारास बंद करण्यात आली. विमानातील कर्मचारी सुरक्षित असून, कोणतीही जीवितहानी किंवा नागरी मालमत्तेचे नुकसान झाले नसल्याचे हवाई दलाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास एका लढाऊ विमानाचा धावपट्टीवर उतरताना अपघात झाला. 'अंडरकॅरेज फेल्युअर'मुळे (विमानाची चाके उघडण्यास तांत्रिक अडथळा) धावपट्टीवर विमानाचा अडथळा निर्माण झाला असून, सध्या धावपट्टीवरील कामकाज तात्पुरते थांबवण्यात आले आहे. हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, धावपट्टी मोकळी करून विमान वाहतूक पूर्ववत करण्यासाठी सुमारे ४ ते ५ तास लागण्याची शक्यता आहे, अशी माहिती पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली.

हवाई दलाचे लढाऊ विमान धावपट्टीवर कोसळल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. याबाबत मात्र हवाई दलाकडून अद्याप कोणताही खुलासा करण्यात आला नाही.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

# 29 एप्रिलचा अल्टिमेटम, 1 मे ‘काळा दिवस

## शेतकऱ्यांचा इशारा मागण्या मान्य करा, नाहीतर आंदोलनाचा स्फोट

● दिव्य मातृछाया
● कैलास आंधळे

**बुलढाणा :** जिल्ह्यात खरीप २०२५ हंगामात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्याप पिक विमा मिळालेला नसल्याने बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने सरकारला इशारा देण्यात आला आहे.

सदर नुकसान शासनाने मान्य करून मदत दिली असतानाही त्याच नुकसानाचा पिक विमा देण्यात येत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सुरुवातीला नुकसान मान्य करण्यासही प्रशासन तयार नव्हते, मात्र शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थिती दाखवून दिल्यानंतरच पाहणी होऊन मदत देण्यात आली. बागायती क्षेत्राबाबतही अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान,१ मे हा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन असल्याने प्रशासनाशी संघर्ष न करता चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्याची भूमिका समितीने घेतली असून, २९ एप्रिल २०२६ पूर्वी मुख्यमंत्री व कृषिमंत्री यांच्या स्तरावर तातडीची बैठक घेऊन शेतकरी प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी निवेदन दिल्यानंतर शेतकरी नेते बालाजी सोसे व इतर पदाधिकाऱ्यांनी सरकारला ठाम आणि तीव्र शब्दांत इशारा देत सांगितले की, “२९ एप्रिलच्या आत शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करून प्रश्न मार्गी लावा, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.”



- ♦ खरेदी-विक्रीवेळी बागायती निकष लावले जातात, मात्र मदत देताना तेच निकष लागू केले जात नाहीत.अनेक शेतकरी हंगामी बागायती निकषांमध्ये पात्र असूनही त्यांना मदत दिली जात नसल्याने संताप वाढत आहे.या प्रश्नासाठी यापूर्वीही आंदोलन करण्यात आले होते.
- ♦ बालाजी सोसे यांनी साठ फूट उंच पाण्याच्या टाकीवर अन्नत्याग आमरण उपोषण केले होते. त्या वेळी प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले, मात्र आजपर्यंत त्याची पूर्तता झालेली नसल्याचे सांगण्यात आले.
- ♦ शेतकरी योद्धा कृती समितीने सरकारकडे खरीप २०२५ साठी सरसकट पिक विमा मंजूर करून त्वरित देण्याची मागणी केली आहे. तसेच बागायती क्षेत्राच्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांना मदत देण्यात यावी, अन्यथा बागायती निकष व शुल्क लागू करू नये, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या वेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबतची खंतही पुन्हा व्यक्त करण्यात आली.यावेळी निवेदन देताना शेतकरी नेते बालाजी सोसे,प्रवीण भाऊ गीते, गजानन जायभाये,गणेश मुंडे,देवानंद सोसे,मधुकरराव शिंदे, विलास वाघ,आकाश खरात, शेख अत्तर, ज्ञानेश्वर कायंदे माजी सरपंच किनगाव राजा व राजा दीपक साळवे आदी उपस्थित होते.

जर २९ एप्रिल २०२६ पर्यंत कोणताही ठोस निर्णय झाला नाही,तर सिंदखेड राजा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.तसेच १ मे ‘काळा दिवस’ म्हणून पाळण्यात येणार असून प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या घरावर काळी गुढी उभारावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

उद्भवणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# लोणार सेंट्रल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई दहावीच्या परिक्षेत पटकावले जिल्ह्यातून अव्वलस्थान

● दिव्य मातृछाया
● राहुल सरदार




- ♦ शाळेच्या प्रथम दोन विद्यार्थ्यांनी बुलढाणा जिल्ह्यातून अव्वलस्थान पटकावले. ८७ पैकी ७२ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.
- ♦ तालुक्यातील एकंदर सीबीएसई शाळांमधून प्रथम २७ विद्यार्थी लोणार सेंट्रल पब्लिक स्कूलचे आहेत. एकूण अकरा विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले.
- ♦ मराठी विषयात तीन विद्यार्थ्यांनी व सामाजिक शास्त्र विषयात एका विद्यार्थ्याने १०० पैकी १०० गुण मिळविले. यशिका पवन कोठारी या विद्यार्थिनीने माहिती तंत्रज्ञान व मराठी विषयात १०० गुण मिळविले तर उमेश रमेश शेटे या विद्यार्थ्याने सामाजिकशास्त्र व मराठी या दोन विषयात १०० गुण मिळविले.

**लोणार :** स्थानिक सीबीएसई शाळा लोणार सेंट्रल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई दहावीच्या परिक्षेत सलग नवव्या बॅचमध्ये देखील घवघवीत यश मिळविले आहे. यशिका पवन कोठारी या विद्यार्थिनीने शाळेतुन व जिल्हयातून सीबीएसई दहावी परिक्षेत बेस्ट फाईव ९९.००% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.

शाळेतुन व जिल्हयातून द्वितीय क्रमांक उमेश रमेश शेटे या विद्यार्थ्याने ९८.८०% गुण मिळवत पटकावले तर शाळेतून व तालुक्यातून तृतीयस्थानी तृप्ती गजानन शिंबरे या विद्यार्थिनीने ९५.८०% गुण प्राप्त केले. वंशिका प्रितम लोढा या विद्यार्थिनीने शाळेतुन व तालुक्यातून चौथे स्थान पटकावत ९५.२०% गुण मिळविले. पूजा ज्ञानेश्वर शिंगणे या विद्यार्थिनीने शाळेतुन व तालुक्यातून पाचवे स्थान पटकावत ९५.००% गुण मिळविले.

अक्षरा हनुमंत जायभाये हिने माहिती तंत्रज्ञान व मराठी विषयात १०० गुण मिळविले. माहिती तंत्रज्ञान या विषयात १०० गुण प्राप्त करणाऱ्या अन्य विद्यार्थ्यांमध्ये भक्ती ज्ञानेश्वर जायभाये, वंशिका प्रीतम लोढा, स्तुती अक्षय संचेती, रुपेश विजय कोचर, अमित संतोष सुभेदार, हर्षिता सचिनकुमार बोरा, अब्दुल रहमान बाजीग अली सिद्दिकी, श्रावणी नितीन शेवाळे, सिद्ध मनोज बरडिया हे विद्यार्थी आहेत. एकुण ८७ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळविले तर २१ विद्यार्थ्यांनी ८५% ते ९०% गुण मिळविले, १९ विद्यार्थ्यांनी ८०% ते ८५% गुण प्राप्त केले. १४ विद्यार्थ्यांनी ७०% ते ८०% गुण प्राप्त केले तर ८ विद्यार्थ्यांनी ६०% ते ७०% गुण मिळविले. दोन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

शाळेचे अध्यक्ष शेख मसुद शेख उस्मान यांनी विद्यार्थी, पालक, प्राचार्य दत्तात्रय कुलकर्णी, उपप्राचार्य नबिल शेख, समन्वयक अंकुश चव्हाण व सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

संचालक मो. फैसल यांनी यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पालकांनी देखील सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य व शालेय व्यवस्थापनाचे तालुक्यातील या अभूतपूर्व यशाबद्दल अभिनंदन केले.

# मंगरुळपीर येथील वायसी सि.बी.एस.सी.ई. इंग्लीश स्कुलचा 100% निकाल

## सहा विद्यार्थ्यांना 90% च्या वर गुण




● दिव्य मातृछाया
● फुलचंद भगत

### यंदा मुलांनी मारली बाजी

- ♦ यंदा मंगरुळपीर येथील वाय सी सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलांनी मुलींना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलींच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलांची टक्केवारी अधिक आहे.

**वाशिम :** स्थानिक मंगरुळपीर येथील वाय सी सिबिएससी इंग्लीश स्कूलचा दहावीचा शैक्षणिक वर्ष 2025–26 च्या सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत 100 टक्के निकाल लागला आहे. निकालाची ही उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे. प्रथम आलेल्या श्लोक बाहेती ला 97.6 टक्के, द्वितीय आलेल्या वसिफ कलिम ला 93.8 टक्के तर नंदिनी बियाणी ला 93.6 टक्के,रेवती महाकाळ 92.4 टक्के,तन्मय सावळेला 92.4,आणी श्रेया देशमुख 90.8 टक्के गुण मिळाले आहेत. तब्बल 6 विद्यार्थ्यांनी 90% टक्क्यांपेक्षा अधिक गुण तर 22 विद्यार्थ्यांनी 80 टक्क्यांहून अधिक गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

शाळेच्या 48 विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावीची सिबिएससी बोर्डची परीक्षा दिली होती. यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाराष्ट्रातील शाळांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची परंपरा मंगरुळपीर येथील वाय सी सिबिएससी इंग्लिश स्कूलने कायम राखली आहे. त्यासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्वांचेच योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे, संस्था सचिव चंद्रकांत ठाकरे, शाळेचे प्राचार्य डॉ.संजिव कुमार सिंग यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था सदैव कटिबद्ध राहील असा विश्वास संस्थेकडुन व्यक्त केला आहे. मंगरुळपीर येथील वाय सि सिबिएससी इंग्लीश स्कुल ही भविष्यातही अशाच पद्धतीने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध असणार आहे असे प्राचार्य संजिवकुमार सिंग यांनी सांगितले.केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे.

शाळेचा निकाल आणी विद्यार्थ्यांच्या यशामागे संस्था अध्यक्ष,संस्था सचिव,शाळेचे प्राचार्य आणी वकील खान,भूषण ठाकरे,श्रीकांत राऊत, दिपाली भोजने,राम वानखडे,स्नेहा दंडे,अक्षय इंगोले,रेणुका देशपांडे आदी शिक्षकांनी ज्ञानदानासाठी अथक परिश्रम घेतले यासोबतच शाळेचे शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही मोलाचे योगदान लाभले.

# मलकापूर पांग्रा येथे भीम जयंतीचा जल्लोष

## तरुणाईचा उत्स्फूर्त नृत्याविष्कार ; पाळणा, मिरवणूक व भक्तिमय वातावरणात डॉ . बाबासाहेबांना अभिवादन



### पांग्रा येथेही भीम जयंती उत्साहात साजरी

- ♦ पांग्रा येथे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी अभिवादन कार्यक्रम, तसेच सायंकाळी मिरवणूक व भीमगीतांच्या कार्यक्रमांनी परिसर दणाणून गेला.
- ♦ यावेळी पंचशील मित्र मंडळाचे अध्यक्ष आदित्य काकडे व मित्र मंडळ उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परशुराम काकडे व महादेव गवई यांनी केले तर आभार प्रदर्शन पृथ्वीराज साळवे यांनी केले.
- ♦ सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येत जयंती उत्सव उत्साहात साजरा करून सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले.

● दिव्य मातृछाया
● वसीम शेख

**मलकापूर पांग्रा :** येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी करण्यात आली. १३ एप्रिल रोजी मध्यरात्री १२ वाजता पाळणा कार्यक्रमाने जयंती उत्सवाची सुरुवात झाली. यावेळी विमलबाई मगर, सविता आराख, मंडूबाई पैठणे, कौशल्याबाई साळवे, कमलबाई साळवे व रंजना साळवे यांनी पाळणा गीत सादर करत वातावरण भक्तिमय केले. तसेच आकर्षक फटाक्यांच्या आतषबाजीने उत्सवात रंगत आणली.

१४ एप्रिल रोजी सकाळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गावातील नागरिकांसह यादवराव टाले, बीट जमादार निवृत्ती पोफळे,अर्जुन मगर, सर्जेराव मगर, सुनील टेलर, नवनाथ नगर, अमोल पैठणी, रामेश्वर सोनकांबळे, अभिमान साळवे, निखिल सोनकांबळे, पत्रकार पवन मगर, पंकज अंभोरे,सुरज मगर, अंकित साळवे, विशाल साळवे, सुरेश काकडे, विकास साळवे, शिवा काकडे, तुषार सोनकांबळे, प्राण मोरे, रोहित साळवे यांच्यासह अनेकांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

सायंकाळी मिरवणुकीपूर्वी ज्येष्ठ पत्रकार भगवान साळवे यांच्या हस्ते रथातील डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेची विधीवत पूजा करण्यात आली. त्यानंतर गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. भीमगीतांच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्त नृत्य करत जल्लोष साजरा केला. या मिरवणुकीत सर्वधर्मीय युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, ज्यामुळे सामाजिक एकात्मतेचा सुंदर संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचा समारोप पंचशील घेऊन करण्यात आला. त्यानंतर चंद्रयानी फटाक्यांची आकर्षक आतषबाजी करण्यात आली व वातावरण पुन्हा एकदा जल्लोषमय झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचशील युवा मित्र मंडळाचे अध्यक्ष संतोष साळवे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप साळवे यांनी केले, तर मेजर शरद साळवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राष्ट्रमाता जिजाऊ कृषी समृद्धी नवनगर कामास विलंब

## तात्काळ निधी व मान्यतेची मागणी

● दिव्य मातृछाया
● रवि ढवळे

**सिंदखेडराजा :** राष्ट्रमाता जिजाऊ कृषी समृद्धी नवनगर, मातृतीर्थ सिंदखेडराजा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या कामास मोठा विलंब होत असून तात्काळ निधी व अंतिम मान्यता देण्याची मागणी राष्ट्रमाता जिजाऊ बाल शिवबा स्मारक समितीचे अध्यक्ष राजेंद्र अंभोरे यांनी केली आहे.

त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सन २०१६ मध्ये महाराष्ट्र समृद्धी महामार्ग प्रकल्प जाहीर झाला तेव्हा स्थानिक शेतकऱ्यांनी शासनावर विश्वास ठेवून जमीन दिली होती. त्या वेळी ५०० किमी मार्गालगत समृद्धी नवनगर उभारून उद्योग, व्यवसाय, शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

मात्र जवळपास दहा वर्षे उलटूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही किंवा कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. यामुळे स्थानिक शेतकरी व युवक अडचणीत सापडले असून बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करत आहेत, शेती करणे कठीण झाले आहे तसेच युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळत नाही.

समृद्धी महामार्ग सुरू झाल्यानंतर नागपूर-मुंबई दरम्यानच्या पारंपरिक व्यवसायांवर परिणाम झाला असून अनेक छोट्या दुकानदारांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ निधीची तरतूद करून या नवनगरास अंतिम मान्यता द्यावी तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगार, उद्योग व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.



# वर्दडी बुद्रुकमध्ये मध्यरात्री चोरट्यांचा धुमाकूळ

## सलग ४ दुकाने फोडून ६४ हजारांची रोकड लंपास ; पोलिस गस्तीवर प्रश्नचिन्ह, व्यापाऱ्यांचा संताप टोकाला

- दिव्य मातृछाया
- अफरोज पठाण

**किनगावराजा :** परिसरात चोरीच्या घटनांची मालिका सुरूच असून, त्यातच वर्दडी बुद्रुक येथे मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत सलग चार दुकाने फोडून सुमारे ६४ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासना वर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, १५ एप्रिलच्या रात्री ते १६ एप्रिलच्या पहाटे दरम्यान ही घटना घडली. चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने वर्दडी बुद्रुकमधील मुख्य बाजारपेठेतील दुकाने लक्ष्य केली. 'आराध्या मेडिकल जनरल स्टोअर्स'सह इतर तीन ते चार दुकाने शटर उचकटून फोडण्यात आली. काही ठिकाणी लोखंडी रॉड किंवा धारदार हत्यारांचा वापर करून शटर वाकवण्यात आले असल्याचे प्राथमिक पाहणीत आढळून आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मात्र, अद्याप कोणत्याही संशयिताला अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे "घटना घडल्यावरच पोलिस सक्रिय होतात" अशी टीका नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या घटनेनंतर वर्दडी बुद्रुक व परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. व्यापाऱ्यांनी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करत रात्रीची गस्त वाढवणे, बाजारपेठेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवणे आणि चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी विशेष पथक नियुक्त करणे वश्यक असल्याचे सांगितले आहे.

> ♦ चोरट्यांनी दुकानदारांच्या कॅश ड्रॉवरमधील रोकड लक्ष्य करत एकूण सुमारे ६४ हजार रुपयांवर डल्ला मारला. याशिवाय दुकानांचे शटर, कुलूपे व इतर साहित्याचे नुकसान केल्यामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान आणखी वाढले आहे. काही दुकानदारांच्या मते, चोरट्यांनी काही ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दिशाही बदलल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.
>
> ♦ या प्रकारामुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड संतापाची भावना असून, त्यांनी पोलिस प्रशासनावर निष्क्रियतेचा ठपका ठेवला आहे. "गेल्या काही महिन्यांत परिसरात वारंवार चोरीच्या घटना घडत आहेत, मात्र पोलिसांकडून प्रभावी उपाययोजना केल्या जात नाहीत. रात्रीच्या वेळी पोलिस गस्त जवळपास नसल्यामुळे चोरट्यांना मोकळे रान मिळाले आहे," अशी तीव्र प्रतिक्रिया व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

संतप्त व्यापाऱ्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, "जर लवकरात लवकर चोरट्यांना अटक झाली नाही आणि सुरक्षेची हमी मिळाली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू."

वर्दडी बुद्रुकमधील ही घटना केवळ चोरीची नसून, ग्रामीण भागातील सुरक्षेच्या प्रश्नाला अधोरेखित करणारी ठरली आहे. आता तरी पोलिस प्रशासन ठोस पावले उचलणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती शिवेंद्रराजे यांचा लघुजीराजे जाधव वंशजांच्या वतीने सत्कार



- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**किनगावराजा दि.17 एप्रिल** रोजी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांचा लखुजी राजे जाधवांच्या वंशजांच्यावतीने सिंदखेडराजा येथे सत्कार करण्यात आला आहे.

छत्रपती शिवराय व महाराणी गुणवंतीबाईसाहेब यांच्या ३७० व्या विवाह सोहळ्याच्या स्मृतिदिना निमित्त आयोजित ऐतिहासिक करवंड महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून आले असता. त्यांनी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील जिजाऊ जन्मस्थळ असलेल्या लखोजीराजांच्या राजवाड्याला भेट दिली. राजवाड्यातील बाल शिवबासह असलेल्या जिजाऊंच्या पुतळ्यांचे त्यांनी दर्शन घेतले. यावेळी आमदार मनोज कायंदे, माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार अल्पसंख्यांक सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.नाझेर काझी, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुनील कायंदे, अतिश तायडे, राजेंद्र आढाव आदींची उपस्थिती होती.

यावेळी देऊळगावराजा येथील श्रीमंत बालाजी मंदिर संस्थानचे पारंपारिक विश्वस्थ विजयसिंह राजेजाधव, किनगावराजा येथील शासकीय कंत्राटदार विजयसिंह भगवंतराव राजेजाधव, प्रा. गोपाल राजेजाधव, आनंद राजेजाधव, ज्ञानेश्वर राजेजाधव, अभिजित राजेजाधव, आडगावराजा येथील भागवत राजेजाधव, अभय राजेजाधव, मेहुणाराजा येथील मार्तंड राजेजाधव, जवळखेड येथील राहुल राजेजाधव आदींनी छत्रपती शिवेंद्रराजेंचा शाल व श्रीमंत लखुजी राजे जाधव यांची प्रतिमा देऊन सत्कार केला.

# देशाची पहिली डिजिटल जनगणनासाठी ऑनलाईन प्रणाली : तहसीलदार मडके

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**मेहकर :** तालुक्यातील डोणगांव - येथील महसूल विभागाच्या सर्व सेवा, योजना थेट जनतेपर्यंत पोहोच विण्यासाठी आणि प्रलंबित प्रश्नांचा जागेवरच निपटारा करण्यासाठी आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये आपल्या देशाची पहिली डिजिटल जनगणना साठी ऑनलाईन प्रणाली साठी प्रत्येक नागरिकाने सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे.



> ♦ दि 17 एप्रिल रोजी ग्राम महसूल अधिकारी कार्यालय येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार निलेश मडके तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी सभापती राजेंद्र पळसकर, कृषी अधिकारी विजय राजूरकर, ठाणेदार अमरनाथ नागरे, नायब तहसीलदार नालट, माजी सरपंच संजय पाटील आखाडे, डोणगांव मंडळ अधिकारी सुरेश डोईफोडे, डॉ गजानन उल्हामाले, उत्तमराव परमाळे, पत्रकारयासीन बेग आदी मान्यवर उपस्थित होते.
>
> ♦ सर्वप्रथम दिप प्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रास्ताविक मनोगतातून ग्राम महसूल अधिकारी कु पल्लवी गुंठेवार यांनी या शिबिरा संदर्भात विस्तृत माहिती दिली.

या महाराजस्व समाधान शिबिरामध्ये कृषी विभाग, आरोग्य विभाग, आदर्श महा ई सेतु केंद्र, अन्न पुरवठा विभाग, संजय गांधी, पोस्ट विभाग, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स सह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी माहिती देण्यासाठी उपस्थित होते. यावेळी आरोग्य अधिकारी अमोल वायकुळे, कृषी अधिकारी विठ्ठल धांडे, ठाणेदार अमरनाथ नागरे, डॉ गजानन उल्हामाले , राजेंद्र पळसकर यांनी शासनाच्या विविध योजनांची विस्तृत माहिती दिली आहे.यावेळी तहसीलदार निलेश मडके सह मान्यवरांच्या हस्ते जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नान क्रिमीलेयर दाखले, आभा कार्ड विभक्तीकरण रेशन कार्ड वाटप करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतातून महसूल विभागाच्या सर्व सेवा योजना थेट जनतेपर्यंत पोहोच, माहितीसाठी, नागरिकांचा त्रास वाचण्यासाठी महाराष्ट्र महसूल प्रशासनाचा हा आदर्श उपक्रम आहे.सर्व लाभार्थींनी मंडळ स्तरावर आयोजित या महाराजस्व समाधान शिबिराचा लाभ घेतला पाहिजे व डिजिटल जनगणना साठी ऑनलाईन प्रणाली साठी प्रत्येक सुज्ञ नागरिकाने सहकार्य करुन शासन दरबारी खरी माहिती पाठविण्याचे आवाहन केले आहे. सुत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन महसूल सेवक संदीप परमाळे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर यशस्वी करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी अनुप नरोटे, अमोल राठोड, कु पल्लवी गुंठेवार, कु सिमा चव्हाण, भुषण खिल्लारे, महसूल सेवक बळीराम मानवतकर, नागेश मानवतकर, गणेश शेळके, महसूल मित्र सुभाष दोडके, विजय खरात सह सेतु संचालक अमोल ठाकरे, गजानन बोंद्रे, राजु वाठोरे, राजु नेमाडे आदिनी अथक परिश्रम घेतले.

# माजी मंत्री सुबोध सावजी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा



## शिवसेना आघाडीची मागणी

- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**खामगाव, दि.17 एप्रिल :** माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपालांना उद्देशून लिहिलेल्या एका पत्रामुळे राज्यात तीव्र वादंग निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर तसेच विविध वृत्तवाहिन्यांवर हे पत्र प्रसारित झाल्यानंतर महिलांविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह आणि अवमानकारक विधानांवरून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. विशेषतः स्वतःहून बलात्कार करून घेणाऱ्या महिला असा शब्दप्रयोग केल्याचा आरोप होत असून, या वक्तव्यामुळे महिलांच्या सन्मानाला धक्का बसल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

> ♦ या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) महिला पदाधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घेत, संबंधित माजी मंत्र्यांविरुद्ध तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, भारतीय दंड विधानानुसार 'बलात्कार' हा संमतीशिवाय केलेला गुन्हा मानला जातो. अशा परिस्थितीत स्वतःहून बलात्कार हा शब्दप्रयोग केवळ कायद्याचे अज्ञान दर्शवणारा नसून, पीडित महिलांच्या वेदनेचा अवमान करणारा आहे.

तसेच, पत्रामध्ये संबंधित महिलांची नावे, फोटो आणि व्हिडिओ सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आल्याचा आरोप असून, यामुळे महिलांच्या खासगी आयुष्याच्या अधिकारावर गदा येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. व्यभिचारी व समाजाला कलंक अशा शब्दांचा वापर करून संपूर्ण स्त्रीवर्गाचा अपमान केल्याचा आरोप करत, या वक्तव्यांमुळे समाजात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन दूषित होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

महिला पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, हे प्रकरण भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४-अ (महिलांवरील लैंगिक छळ), कलम ५०९ (महिलांच्या लज्जेचा अपमान करणारे शब्द) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार गुन्हा ठरू शकतो. त्यामुळे या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधितांविरुद्ध तातडीने एफआयआर नोंदवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

दरम्यान, या प्रकरणावर अद्याप संबंधित माजी मंत्र्यांची अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. मात्र, राजकीय आणि सामाजिक वर्तुळात या घटनेचे पडसाद उमटत असून, महिलांच्या सन्मान आणि सुरक्षेच्या मुद्यावरून पुन्हा एकदा चर्चा रंगू लागली आहे.

# वनविभागाची उदासीनता; घाटबोरीत 'वन व्यवस्थापन समिती' कागदावरच

- दिव्य मातृछाया
- वृत्त संकलन

**मेहकर :** मेहकर तालुक्यातील घाटबोरी गावात वनविभाग आणि ग्रामपंचायतीच्या उदासीन कारभारामुळे संयुक्त वन व्यवस्थापन समिती गेल्या तब्बल सात वर्षांपासून केवळ कागदावरच अस्तित्वात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. पर्यावरण संवर्धन, जंगलांचे संरक्षण आणि गावाच्या



सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही समिती अध्यक्षाची मुदत संपूनही प्रत्यक्षात कार्यरत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

> ♦ सन २००३ पासून महाराष्ट्र शासनाने संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. या समित्यांच्या माध्यमातून गावकरी आणि वनविभाग यांच्यात समन्वय साधून जंगलांचे संरक्षण, वनसंपत्तीचा शाश्वत वापर आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचा उद्देश होता. मात्र, घाटबोरीसारख्या जंगलांनी वेढलेल्या गावातच या योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

घाटबोरी येथील सामाजिक कार्यकर्ते राजू तुकाराम कुसळकर यांनी या प्रकरणी पुढाकार घेत ग्रामपंचायत कार्यालयात लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनाद्वारे त्यांनी वन व्यवस्थापन समितीची पुनर्गठण ग्रामसभेतून करून अध्यक्ष व सदस्यांची निवड पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी, तसेच येणाऱ्या ग्रामसभेत यासंदर्भात ठराव घेण्यात यावा, अशी मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने या मागणीची तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

घाटबोरी हे जिल्ह्यातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे वनपरिक्षेत्र मानले जाते. गावाच्या चहुबाजूंनी घनदाट जंगल असूनही वन व्यवस्थापन समिती अस्तित्वात नसल्यामुळे जंगल संरक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, जर संयुक्त वन व्यवस्थापन समिती प्रभावीपणे कार्यरत असेल, तर जंगलाचे संरक्षण अधिक चांगल्या पद्धतीने होऊ शकते.

तसेच गावाच्या विकासालाही चालना मिळू शकते. मात्र, सात वर्षांपासून समिती केवळ कागदावरच असल्याने शासनाच्या धोरणांनाच हरताळ फासला जात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी वनविभागाने तातडीने ठोस पावले उचलावीत, ग्रामसभेतून वन व्यवस्थापन समितीची पुनर्गठण करून ती प्रत्यक्षात कार्यान्वित करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. आता या गंभीर प्रश्नावर प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.